# प्रेसनोट
## भंडारा जिल्हा पोलीस

जा.क्र. ३८२/जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०७/२०१८

**'महाराष्ट्र पोलीस दलाचे नाविन्यपुर्ण उपक्रम पुस्तीका उत्तम पध्दती ते भावी पध्दती २०१७—२०१८ मध्ये भंडारा जिल्हयातील फिरते पोलीस स्टेशन प्रणालीचा समावेश'**

सन २०१७—२०१८ मध्ये जनतेच्या समस्या सोडविण्याकरीता व लोकांमध्ये पोलीसांप्रती विश्वासाची भावना निर्माण करण्याचे उद्देशाने राज्यात विविध जिल्हे, आयुक्तालये, विशेष घटक यांनी सुरू केलेल्या उपक्रमांपैकी पोलीस महासंचालक कार्यालयाने तयार केलेल्या उत्तम पध्दती ते भावी पध्दती २०१७—२०१८ या पुस्तकात एकुण १५ घटकांनी अमलात आणलेल्या योजनांपैकी ५ विशेष घटक ३ आयुक्तालय ३ परिक्षेत्रीय कार्यालये व ४ जिल्हे यांचा समावेश असुन मा. पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांचे नाविन्यपुर्ण संकल्पनेतुन सुरू झालेल्या व जिल्हयात यशस्वीपणे राबविण्यात येत असलेल्या **''फिरते पोलीस स्टेशन''** भंडारा पोलीस **''आप के साथ भी, आप के पास भी ''** चाही समावेश करण्यात आला आहे. राज्यातील सर्व पोलीस जिल्हे, आयुक्तालये, विशेष घटक व परिक्षेत्रीय कार्यालय यांचेकडुन अमलात आणलेल्या योजना व त्यामुळे झालेल्या सकारात्मक बदलांची माहीती पोलीस महासंचालक कार्यालयाने संकलीत केली आहे. सदर माहीती इतर घटकांना प्रोत्साहीत करण्यासाठी तसेच सर्वांना माहीतीचा फायदा होण्याचे उद्देशाने तयार करण्यात आलेल्या पुस्तीकेत भंडारा जिल्हयातील **फिरते पोलीस स्टेशन** उपक्रमाचा विशेष समावेश करण्यात आला आहे.

दि. २६/०१/२०१७ रोजी भारताच्या ६८ व्या प्रजासत्तक दिनाचे औचीत्य साधुन श्रीमती विनीता साहू पोलीस अधीक्षक भंडारा यांचे नाविन्यपुर्ण संकल्पनेतुन दुरक्षेत्रामध्ये राहणा—या नागरीकांच्या तक्रारीसाठी भंडारा पोलीस '' **आप के साथ भी, आप के पास भी** '' फिरते पोलीस ठाणे ही प्रणाली भंडारा जिल्हयात राबविण्यात येवुन भंडारा पोलीस ठाणे येथे प्रायोगिक तत्वावर पहिला फिरते पोलीस ठाणे कॅम्प पोलीस स्टेशन भंडारा अंतर्गत घेण्यात आला होता फिरते पोलीस ठाणे अंतर्गत एका गावाची निवड करून त्या गावाचे सरपंच, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, व बिट अंमलदार यांना वरिष्ठ अधिकारी हे मार्गदर्शन करून फिरते पोलीस स्टेशन मध्ये जनतेला एटीएम फ्रॉड,महिला व बाल अत्याचार, सायबर गुन्हे संशयीत फेरेवाले, वृध्द व म्हातारे लोकांना एटीएम मधुन पैसे काढुन देतो म्हणुन एटीएम बदलनारे, व पैशांची हेराफेरी करणारे, शाळकरी मुलांकडुन मोबाईलचा होणारा गैरवापर, पौगंडावस्थेतील मुलींच्या शरीरात होणारे बदल विरूध्दलींगी आकर्षण व त्यातुन मुलींना फुस लावुन पळवुन नेण्याचे होणारे प्रकार, लॉटरी लागली म्हणुन फोन व मॅसेज करून फसवणुक होणे, अधंश्रध्दा निर्मुलनाबाबत मार्गदर्शन, सोने चमकवुन देण्याचे बहाण्याने नकली सोने देवुन पसार होणे. कमी भावात सोने देतो म्हणुन नकली सोने देवुन फसवणुक करणे, अशाबाबत माहीती देण्यात येते तसेच उपरोक्त

गावातील प्रतिष्ठीत नागरीक यांच्या उपस्थितीत नागरीकांच्या तक्रारीची समस्यांची नोंद करून तक्रारीचे वेळीच निराकरण करण्यात येते त्यामुळे नागरीकांचे तक्रारीबाबत समाधान होवु लागले. तक्रारीची प्रगती व निर्गती तक्रारदार यांना कळविल्याने पोलीस ठाण्यातील तक्रारदाराचे पोलीस स्टेशन ला वांरवांर येण्या –जाण्याचा त्रास कमी होवुन पैसे व वेळेची बचत झाली आहे. फिरते पोलीस स्टेशन संकल्पनेतुन १७ पोलीस स्टेशन मध्ये ११६५ फिरते पोलीस ठाणे कॅम्पचे आयोजन करण्यात आले यामध्ये २५२ तक्रारी प्राप्त झाल्या व त्या सर्व तक्रारीचा जागेवरच निपटारा करण्यात आला. फिरते पोलीस स्टेशन मुळे नागरीकांमध्ये कायदेविषयक व महिलांमध्ये स्वत:च्या सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण झाली आहे. तसेच गावातील दिवाणी, महसुली, फौजदारी व इतर जुने वाद वेळीच सामजस्याने सोडविल्याने पुढे त्याचे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याचे टळले आहे. ग्राम विकासाच्या प्रक्रियेत अडचणी ठरलेल्या तक्रारी सोडवुन गावच्या विकासाचा मार्ग सोपा झालेला आहे. दिनांक २८ जानेवारी २०१७ पासुन फिरते पोलीस स्टेशन हि संकल्पना राज्यशासनाने संपुर्ण राज्यात लागु करण्याबाबत आदेश पारीत केले आहे. फिरते पोलीस ठाणे हि संकल्पना नागरीकात लोकचळवळ बनली आहे.

(जितेद्रं के. आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आह

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.